क्र.साप्रवि/मभाक/न.क्र.७७/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९*

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.२८८ दिनांक १९ / ०४ / २०१०

विषय : प्रशासकीय दैनंदिन कामकाज मराठी भाषेतून करण्याबाबत

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.२३, दिनांक ०२/०३/२००६
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.७४, दिनांक १८/०९/२००६
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.१००, दिनांक २१/०३/२००७
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.१७४, दिनांक १९/०९/२००८
५) प्रशासकीय परिपत्रक क्र.२७३, दिनांक ०२/०१/२०१०

----------

प्रशासकीय दैनंदिन कामकाज अपरिहार्यता वगळता एरवी मराठी भाषेतूनच करण्याचे महाराष्ट्र शासनाचे प्रशासकीय धोरण पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने अंगीकारलेले होते. मंडळाच्या विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीनेही तेच प्रशासकीय धोरण अवलंबिले आहे.

२. त्यानुसार कंपनीने आतापर्यंत संदर्भांकित प्रशासकीय परिपत्रकान्वये वेळोवेळी मराठी भाषेच्या वापराविषयी सूचना जारी केल्या आहेत. अशा सूचनांमध्ये ‘रबरी ठसे व मुद्रा मराठीत तयार करून घेणे’, ‘अधिकाऱ्यांचे नामफलक मराठीतून तयार करून घेणे’ इत्यादी सूचनांचाही समावेश आहे. संगणकीकरणानंतर उद्भवलेल्या परिस्थितीवरही महाराष्ट्र शासनाने उपाययोजना केली असून त्यानुसार संगणकातील देवनागरी लिपि व वर्णमाला अद्ययावत करण्याबाबतच्या सूचना उपरोक्त अनुक्रमांक ५ चे प्रशासकीय परिपत्रकाद्वारे अलिकडेच देण्यात आल्या आहेत.

३. या संदर्भात सर्व अधिकारी/कर्मचारी यांना पुन्हा सूचित करण्यात येते की प्रशासकीय दैनंदिन कामकाज अपरिहार्यता वगळता जास्तीत जास्त मराठी भाषेतूनच करण्यात यावे. या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे अवलोकन करावे व त्याचे काटेकोरपणे पालन होईल याबाबत दक्षता घ्यावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(सु.य. पाटील)
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

*E/Adm.Cir.-Daily work in Marathi*